वर्ष-०७ अंक-२७ मुंबई, मंगळवार २५ ते ३१ मे २०२१ पृष्ठ-४

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 मुंबईत साडेतीन किलो चरससह दोन अटकेत

3 → तौक्ते वादळामध्ये होर्डिंग कोसळून दुर्घटना; कंपनी मालकावर गुन्हा

पोलिसांवरील हल्लाप्रकरणी रालोद नेता अटकेत, निवडणूक काळात केली होती दगडफेक ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## मुंबईत आमदाराच्या पत्नीचा आत्महत्येचा प्रयत्न



वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याने शनिवारी सकाळी एका महिलेला आत्महत्या करण्यापासून रोखलं होतं. चौकशी केली असता ही महिला आमदाराची पत्नी असल्याची माहिती समोर आली. टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, सकाळी सव्वा दहाच्या सुमारास मानखुर्द पोलीस वाहतुकीचं नियोजन करत असताना एका ...पान २ वर...

## मुंबई, ठाण्यात लक्षणीय रुग्णघट



मुंबई : राज्याचा करोना रुणआलेख घसरत असून, मुंबई, ठाण्यात लक्षणीय रुणघट नोंदविण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि ...पान २ वर...

# महाराष्ट्र चार टप्प्यात अनलॉक होणार?

# कसा असू शकतो ठाकरे सरकारचा प्लॅन, जाणून घ्या!

### मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक या मोठ्या शहरांमधील कोरोना रुग्णांची संख्या गेल्या काही दिवसांत लक्षणीय घटली आहे.





मुंबई: गेल्या काही दिवसांपासून राज्यातील कोरोना रुग्णांची संख्या कमी होत आहे. एप्रिल महिन्यात राज्यात दररोज ७० हजारांहून अधिक रुग्ण आढळून येत होते. आता हाच आकडा ३० हजारांच्या खाली आला आहे. त्यामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणेवरील ताण काहीसा कमी झाला आहे. राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी देखील रविवारी माध्यमांशी बोलताना लॉकडाऊनबाबत महत्वाची माहिती दिली होती. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक या मोठ्या शहरांमधील कोरोना रुग्णांची संख्या गेल्या काही दिवसांत लक्षणीय घटली आहे. कोरोना रुग्ण वाढीचा वेग कमी झाला आहे. त्यामुळे या शहरांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र ग्रामीण भागांत कोरोनानं हातपाय पसरले आहेत. त्यामुळे आरोग्य व्यवस्थेवरील ताण वाढला आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना आरोग्यमंत्र्यांनी महत्त्वपूर्ण संकेत दिले. '१ जूनपासून निर्बंध टप्प्याटप्प्यानं शिथिल केले जातील. कोरोना रुग्णांची संख्या नियंत्रणात असलेल्या जिल्ह्यांमधील निर्बंध हळूहळू मागे घेतले जातील, असं राजेश टोपे यांनी सांगितलं आहे. सध्या राज्यात कठोर निर्बंध लागू आहेत. दुकानं केवळ सकाळी ७ ते ११ या वेळेतच सुरू ठेवण्याची मुभा आहे. याचा परिणाम अनेक ठिकाणी दिसून आला आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आला ...पान २ वर...

## 14 जण अद्याप बेपत्ता




मुंबई : तौक्ते चक्रीवादळामुळे अरबी समुद्रात बुडालेल्या 'पी ३०५' तराफ्यावर २६१ कर्मचारी कार्यरत होते, तर वरप्रदा नौकेवर १३ जण होते. तराफा आणि नौकेवरील मिळून अद्यापही १४ जण बेपत्ता असून नौदलाकडून त्यांचा शोध सुरू आहे. 'पी ३०५' तराफ्यावरील आणखी चार मृतदेह मिळाले असून आतापर्यंत या तराफ्यावरील ७० जणांचे मृतदेह सापडले आहेत. या तराफ्यावरील पाच जण अद्याप बेपत्ता आहेत. गुजरात किनाऱ्यावर वरप्रदा या नौकेवरील कर्मचाऱ्यांशी मिळतेजुळते दोन मृतदेह सापडले आहेत. नातेवाईकांकडून या मृतदेहांची ओळख पटविणे अद्याप बाकी आहे, तर वरप्रदा नौकेवरील नऊ जण अद्यापही बेपत्ता आहेत.

दरम्यान, नौदलाकडून आतापर्यंत ६८ मृतदेह मुंबई पोलिसांकडे सोपविण्यात आले आहेत. पोलिसांनी ओळख पटविलेले ४५ मृतदेह अंत्यविधीसाठी कुटुंबीयांच्या ताब्यात दिले आहेत. दरम्यान यातील काही मृतदेहांची ओळख पटविणे अद्याप बाकी आहे. पोलिसांकडून मृतदेहांच्या नातेवाईकांची ओळख पटविणे सुरू आहे. पाण्यात राहिल्याने मृतदेह कुजले आहेत. त्यामुळे शरीरावरील खुणा, दागिने, कपडे यांवरून त्यांची ओळख पटवण्यात येत आहे. तसेच ज्या मृतदेहांची ओळख पटविणे शक्य नाही त्यांचे डीएनए नमुने गोळा करण्यात आले आहेत. पोलिसांनी नौकेवरील ५ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या डीएनएचे नमुने चाचणीसाठी घेतले आहेत, अशी ...पान २ वर...

## नवघर पोलीसांनी लावला मोटार सायकलचा अपहार करणाऱ्या आरोपीचा शोध

### गुन्हे तपासात मोटार सायकल हस्तगत करून आरोपीस केले जेरबंद



नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. 1 ३७८/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ८४०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री. जितेन जयतीलाल सालंकी, यांनी त्यांचे मालकीची बजाज कंपनीची अँव्हेंजर माटार सायकल विक्रांसाता ओ.एल.एक्स. या वेबसाईटवर जाहरात प्रसारीत केली होती. फिर्यादी यांची मोटार सायकल हर्दिक शहा नावाचे इसमाने विकत घेण्याची तयार दर्शवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्यांची मोटार सायकल चालवुन पाहतो असं सांगुन घवुन ॥फ्यांदा यांना परत न करता तिचा अपहार केलेला होता. सदर गुन्हा हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याकरीता नवघर पोलीस टाण्याचे ...पान २ वर...

## रात्रीच्या वेळी पादचारी इसमास ठोकर मारुन त्याचे मृत्यूस कारणीभूत ठरुन पळून गेलेल्या दुचारीस्वारास अटक

# नवघर पोलीसांची कामगिरी




नवघर पालीस ठाणे गुन्हा रजि. नं. 1 ३७६/२०२१ भा.दं.वि. सं.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४,१८'७ प्रमाण गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्रीमती स्नेहन रविंद्र शितप, वय ४३ वर्षे, यांचे पती रविंद्र विश्राम शितप,वय ५० वर्षे, हे इंद्रलोक ते गोल्डन नेस्ट सर्कल लेनलगत अक्वा लॉज जवळील आयसीआयसीआय बेकेचे एटीएममधुन पैसे काढुन रस्ता ओलांडत असतांना एका अनोळखी मोटार सायकल स्वाराने भरधाव वेगात धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला हाता. सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने तो लवकरात लवकर उघडकीस आणण्याकरीता नवघर पोलीस ठाण्याच गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी सागितलेल्या वर्णनाचे आधारे तांत्रिक तपास करुन तसेच अपघाताच वळशी साधर्म्य साधुन नमुदचा गुन्हा हा रॉयल्न इन्फील्ट कंपनीची थंडरबर्ड मोटार सायकल क्र. एमएच ०४ जेएल ०१८१ वरील चालक नाम राहुल दन्नात्रय रसाळ, रा. भाईदर पश्चिम यांनी केलेला असल्याच तपासात निष्पन्न करुन त्यास अटक करण्यात आलेली आहे. नमुद गुन्हा दाखल हाताच आपघात करणा या अनोळखी आरोपीताची कोणती ठास माहिती नसतांना गुन्हयाच गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हयाचा तत्काळ तांत्रिक तपासाच आधाराने ...पान २ वर...

## नवघर पोलीसांनी खोटे नाव सांगून फसवणूक करणाऱ्या इसमास अटक करुन त्याचेकडुन 06,59,400/ रु. किंमतीचा गेला मुद्देमाल केला हस्तगत




नवघर पोलोस ठाणे गुन्हा रजि. नं. 1 ३८२/२०२१ भा.दं.बि. सं.कलम ४२०,४०६ प्रमाण गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी हरेश जर्गाजबन बिठलानी, वय ५७ वषे, यांचेकडुन आरोपी दिनेश बौ. शहा असे खोटे नाब सांगुन तसेच मला २० टन साखर दान करायची असल्याने सांगुन ०६,५९,४००/रु. कि. ला विकत घेवुन त्याच पैसे फिर्यादी यांना न देता स्वत:चा संपक क्रमांक बंद करुन फसवणुक केली होती. सदर गुन्हा हा लबकरात लबकर उघडकोस आणण्यासाठी नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटोकरण पथकातील अधिकारी ब अंमलदार यांनी तांत्रिक तपासाच्या आधारे तपास करुन नमुदचा गुन्हा हा आरापो नाम दिनेश बी. शहा ऊर्फ तुषार बाबुभाई लुहार, रा. मिरारोड पुर्ब, व मोहमद सईद रिफाकत हुसन सय्यद, रा. मिरारोड यांनी आपसात संगणमत करुन केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार आरापी नामे मोहमद सईद सय्यद यास नयानगर, मिरारोड पुर्व येथुन ताब्यात घवुन त्याच्याकडं तपास करुन त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. त्यानंतर त्याने गुन्हयातील फसवणक केलला ०६,५९,४००/रु. किं. ची साखर त्यात ५० किलो ग्रॅम बजनाच्या एकुण ४०० गाण्या असा मुद्देमाल अनमोल ट्रेडींग कंपनी, नयानगर मिरारोड पुर्व येथे ठेवला असल्याच सांगितल्यान सदरचा मुद्दमाल हस्तगत करण्यात आलला आहे. तसेच गुन्हयातील ...पान २ वर...

## मुंबईतील 'या' पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्याला लाच प्रकरणी अटक




धारावी, बांधकाम व्यावसायिकावर दाखल असलेल्या गुन्ह्यात कारवाई न करण्यासाठी त्याच्याकडून लाच मागणाऱ्या धारावी पोलिस ठाण्यातील दोन अधिकाऱ्यांवर लाचलुचपत विरोधी विभागाने गुन्हा दाखल केला. सहायक पोलिस निरीक्षक प्रभाकर जोशी आणि उपनिरीक्षक अमोल गाडे अशी ...पान २ वर...

## गुजरातला जाणाऱ्या कारमध्ये नोटांचं घबाड, सकाळपासून नोटा मोजता मोजता उलटली संध्याकाळ; अधिकारीही चक्रावले

जयपूर: राजस्थानच्या डुंगरपूर येथे दिल्लीहून गुजरातला जाणारी एक कार पोलिसांनी ताब्यात घेतली. या कारची तपासणी करण्यात आली असता त्यात नोटांचं घबाड सापडलं. त्यामुळे अधिकाऱ्यांनी या नोटा मोजण्यास सुरुवात केली. सकाळपासून या नोटांची मोजणी सुरु होती. नोटा एवढ्या प्रमाणावर होत्या की नोटा मोजता मोजता संध्याकाळ उलटली. त्यामुळे पोलीस आणि अधिकारीही चक्रावून गेले.

कोट्यवधी रुपये घेऊन निघालेली ही कार दिल्लीहून गुजरातला जात होती, असं सांगितलं जातं. तसेच हा सर्व पैसा हवाल्याचा असल्याचाही प्राथमिक अंदाज आहे. शनिवारी डुंगरपूर जिल्ह्यातील बिछीवाडा पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी नॅशनल हायवे रस्ता क्रमांक 8 वर एक कार अडवली. या कारची तपासणी केली असता त्यात नोटांचं घबाड आढळून आलं. एक दोन लाख नव्हे तर तब्बल 4.5 कोटी रुपये या कारमधून जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. सर्व



रक्कम जप्त करण्यात आली असून आरोपींची कसून चौकशी केली जात आहे. हा पैसा हवाला मार्गे आला असावा, असं डीएसपी मनोज सवारियां यांनी सांगितलं.

**बँकांकडून मशीन मागवली**

कारमध्ये प्रचंड प्रमाणात नोटा सापडल्याने पोलीसही चक्रावून गेले. ही रक्कम किती असेल याचा अंदाज पोलिसांना येत नव्हता. शिवाय हाताने नोटा मोजणंही शक्य नव्हते. पोलीस ठाण्यात नोट मोजण्याची मशीन नव्हती. त्यामुळे बँकांमधून नोट मोजण्याची मशीन मागवण्यात आली. सकाळपासून मशीनने या नोटा मोजण्यात आल्या. नोटा मोजता मोजता संध्याकाळ झाली. त्यामुळे अधिकाऱ्यांचीही दमछाक झाली. ही संपूर्ण रक्कम 4.5 कोटी असल्याचं पोलिसांनी सांगितलं. ...पान २ वर...

# मुंबईत साडेतीन किलो चरससह दोन अटकेत



मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने वांद्रे पश्चिम येथे कारवाई करीत ड्रग्ज विक्री करणारा आणि त्याला ड्रग्ज पुरविणारी महिला अशा दोघांना अटक केली. या दोघांकडून सुमारे सवा कोटीचे साडेतीन किलो चरस हस्तगत केले आहे. हे चांगल्या प्रतीचे मनाली चरस असून इतक्या मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ सापडल्याने यामागे मोठे रॅकेट सक्रीय असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. वांद्रे पश्चिम येथील चिंचवाडी परिसरात एक व्यक्ती चरस विकण्यासाठी येणार असल्याची माहीती गुन्हे शाखा युनिट ७ चे प्रभारी पोलिस निरीक्षक मनीष श्रीधनकर यांना मिळाली. या माहीतीची शहानिशा करण्यासाठी युनिट ७ च्या पथकाने या ठिकाणी सापळा लावला. याठिकाणी संशयास्पद फिरणाऱ्या किशोर गवळी याला ताब्यात घेतले. अंगझडतीमध्ये त्याच्याकडे मनाली चरसचे ७ लहान गोळे सापडले. याबाबत विचारताच सुरूवातीला तो उडवाउडवीची उत्तरे देत होता मात्र अखेर हे अंमली पदार्थ वांद्रे येथील साने गुरूजी सेवा मंडळाच्या जवळ राहणाऱ्या जोहराबाई शेख हिच्याकडून घेतल्याचे त्याने सांगितले.

पोलिसांच्या पथकाने जोहराबाई हिच्या घरी छापा टाकला असता मोठ्या प्रमाणात चरसचा साठा आढळला. सुमारे साडेतीन किलो वजनाचा हा चांगल्या प्रतीचा मनाली चरस असून किंमत सवा कोटी रूपये असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

# बेकायदा बांधकामे मुंबई पालिकेच्या रडारवर; 'अशी' ठेवली जाणार नजर




मुंबईतील अतिक्रमणांची समस्या संपुष्टात आणण्यासाठी पालिकेकडून वेगवेगळे उपाय केले जात आहेत. परंतु, त्यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून आता थेट सॅटेलाइटच्या सहाय्याने लक्ष ठेवण्याची पालिकेची योजना आहे. अतिक्रमणांवर नियंत्रण आणण्यासाठी सॅटेलाइटवरून नजर ठेवण्याचा पर्याय पालिकेकडून पडताळला जात आहे. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. 'जिओग्राफिक इन्कॉर्मेशन टेक्नोलॉजी'च्या (जीआयएस) प्रणालीच्या आधारे होणाऱ्या सर्वेक्षणाच्या अतिक्रमण रोखले जाण्याचा प्रयत्न केला जात आहे. पालिकेकडून अतिक्रमणे थांबविण्याचे प्रयत्न चालवले जात असले तरीही त्यात पूर्णपणे यश आलेले नाही. म्हणूनच पालिकेकडून सॅटेलाइटची जोड घेउन अतिक्रमणांना रोखण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी पालिकेकडून आवश्यक असलेली 'जीआयएस' प्रणाली विकसित केली जाणार आहे. त्यासाठी पालिकेकडून सुमारे १० कोटी रुपयांचा खर्च केला जाईल. त्यासाठी निविदाही काढण्यात आल्या असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. मुंबई पालिकेच्या हद्दीत सर्व वैध, अधिकृत बांधकामांची संपूर्ण ठेवली जाते. त्याआधारे पालिकेस शहरातील नेमक्या मालमत्तांची माहिती मिळून त्याआधारे मालमत्ता कर गोळा करता येतो. पण शहरातील काही भागांत अवैध, अनधिकृत बांधकामांचा झालेला सुळसुळाटाची नोंद होत नाही. तशी नोंद होण्यासाठी 'जीआयएस' तंत्रामुळे नेमक्या जागा ओळखणे, निश्चित करणे शक्य होणार आहे. त्यामुळे अधिकृत आणि अनधिकृत बांधकामांमधील सीमारेषा पुसल्या जातील. हा सारा लेखाजोखा नोंदीच्या स्वरूपात उपलब्ध होणार असल्याचा फायदा पालिकेस होणार आहे. त्याआधारे अनधिकृत बांधकामांवर कारवाईतील बरेचसे अडथळे दूर होण्याचाही दावा केला जात आहे. शहरातील अतिक्रमणांवर नजर ठेवली जाण्याचा आणखी एक फायदा खारफुटी, नदी, नाल्यांच्या संवर्धनासाठीही होणार आहे. बऱ्याचदा खारफुटी, नदी, नाल्यांकडे भराव टाकण्याचे प्रकार घडतात. त्यामुळेच, सॅटेलाइटची नजर रोखली गेल्यास भराव टाकण्याचे प्रकार थांबतील.

# पोलीस पाठलाग करत असल्याचं पाहून आधी आली चक्कर, मग काही वेळातच...; अंगाचा थरकाप उडवणारा प्रकार



सोलापूर : अवैध व्यवसायिकांच्या घरावर छापा टाकायला आलेल्या पोलिसांना घाबरून पळून जाताना एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. नागेश हेगडे असं या २४ वर्षीय तरुणाचे नांव असून सदरची घटना मंगळवेढा तालुक्यातील नंदूर येथे घडली आहे.

या घटनेतील तरुणाचा मृत्यू हा पोलिसांच्या पाठलागामुळे झाल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आणि मृतदेह पोलीस ठाण्याच्या आवारात आणला. शेवटी अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी या घटनेची उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याचे लेखी पत्र दिल्यानंतर नातेवाईक शांत झाले आहेत.

नंदुर तालुक्यातील मंगळवेढा इथे हेगडे परिवारातील एक सदस्य अवैध व्यवसाय चालवतात. तसा गुन्हा यापूर्वी दाखल झालेला आहे. त्याच आधारे शुक्रवारी सकाळी १०:३० च्या सुमारास पोलीस अधिकारी व कर्मचारी गावातील हेगडे यांच्या दारू धंद्यावर कारवाई करण्यासाठी येताच त्यांना पाहून नागेश नाथा हेगडे( वय २४) हा युवक पळून जात होता.यावेळी पोलीस आपला पाठलाग करत असल्याचं पाहून काही अंतरावर तो चक्कर येऊन कोलमडून खाली पडला. त्यात तो बेशुद्ध झाला. त्याला गावातील डॉक्टराकडे नेले असता डॉक्टरांनी त्याला उपचार करणेसाठी मंगळवेढा रुग्णालयाकडे नेण्यास सांगितले. त्यानुसार महिला हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले तेथील डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले.

# मुंबईत आमदाराच्या पत्नीचा आत्महत्येचा प्रयत्न, पुलाच्या ग्रीलवर बसली अन्...



मुंबई : शनिवारी सकाळी आत्महत्या करण्यासाठी निघालेल्या महिलेचा वाहतूक पोलिसांच्या एका कॉन्स्टेबलने जीव वाचवला आहे. यानंतर पुढील तपासामध्ये महिला एका आमदाराची पत्नी असल्याचं समोर आलं आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पोलीस तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

सकाळी 10.15 वाजेच्या सुमारास मानखुर्द वाहतूक पोलिसांचे पथक वाहतूकचे मार्ग दाखवत होते, त्यावेळी एका मोटारगाडी चालकांनी पोलिसांनी महिला पुलाच्या ग्रीलवर बसली असल्याची माहिती दिली. यावेळी वाहतूक शाखेच्या कॉन्स्टेबल ढगे यांनी तातडीने त्या ठिकाणी धाव घेतली आणि सहकाऱ्यांनी कंट्रोल रूम, मानखुर्द स्थानिक पोलीस ठाणे आणि नवी मुंबई पोलिसांना याची माहिती दिली.

ढगे यांनी मोठ्या युक्तीने महिलेला ग्रीलमधून खाली येण्यास उद्युक्त केलं. नंतर तिला मानखुर्द पोलीस ठाण्यात आणण्यात आलं आणि तिथे तिची चौकशी केली असता ती एका आमदाराची पत्नी असल्याचं उघड झालं. घरगुती वादामुळे अस्वस्थ असून आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला अशी माहिती तिने पोलिसांना दिली.

# धक्कादायक! करोना काळात अनधिकृत लॅबचालकांचा सुळसुळाट; सरकारचंही दुर्लक्ष?



कोल्हापूर : राज्यात पॅरामेडिकल कौन्सिलची स्थापना होऊन चार वर्षे झाली. तरीही नोंदणीसाठी केवळ तीन हजारच लॅब चालकांचे अर्ज आले आहेत. त्यामधील दीड हजार अर्जांना मान्यता दिली असून अजूनही सात हजारांहून अधिक अधिकृत लॅबचालकांनी नोंदणीसाठी कौन्सिलकडे येण्याचं टाळलं आहे. अशातच राज्यात २५ हजारांपेक्षा जास्त अनधिकृत लॅबचालकांनी करोना काळात रूग्णांकडून लुटालूट सुरू केल्याने सध्या हा प्रश्न अतिशय गंभीर बनला आहे. राज्यात पॅथॉलॉजिस्टची संख्या अतिशय कमी आहे. त्यामुळे सरकारने डीएमएलटी पदवी धारकांना क्लिनिकल लॅबरोटरी सेवा देण्यासाठी मान्यता दिली. त्यासाठी चार वर्षापूर्वी महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिलची स्थापना करण्यात आली. लॅबचालकांना या संस्थेची मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशी मान्यता न घेता लॅब सुरू ठेवल्यास त्यावर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात सध्या दहा हजारांपेक्षा अधिक लॅब असल्या तरी चार वर्षात केवळ तीन हजार चालकांनीच या संस्थेकडे मान्यतेसाठी अर्ज केले आहेत. त्यामधील दीड हजार चालकांना मान्यता दिली असून उर्वरित मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत. बहुतांशी चालक नोंदणीसाठी टाळाटाळ करत आहेत. यामधील अनेकांकडे अधिकृत शैक्षणिक पात्रता नसल्यानेच ते कौन्सिलकडे नोंदणीसाठी अर्ज करत नसल्याचे समजते. पॅरामेडिकल कौन्सिलमध्ये समाविष्ट नसलेल्या, मान्यताप्राप्त मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी पदवी, पदविका नसताना अनेकांनी लॅब उघडले आहेत. वर्षभरात करोनाचा संसर्ग वाढल्याने आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण पडत आहे. याचाच गैरफायदा घेत गल्लीबोळत अनाधिकृत लॅब सुरू होत आहेत. त्यांच्याकडून रूग्णांची लुटालूट सुरू आहे. अशा लॅबची संख्या पंचवीस ते तीस हजारावर असल्याच्या तक्रारी आहेत. कमिशनच्या हव्यासापोटी डॉक्टरच या लॅबकडे रक्त व लघवी तपासणीसाठी रुग्णांना पाठवत आहेत. यामुळे सध्या अशा अनाधिकृत लॅबचा धंदा जोरात आहे.

# लॉकडाऊन काळात भयंकर घटना; सराफाला सोनं घेऊन बोलावलं आणि...

बीड जिल्ह्यात खून केल्यानंतर मृतदेह नगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात आणून पुरण्यात आला. अखेर तीन दिवसांनंतर हे प्रकरण उघडकीस आलं असून पोलिसांनी दोघांना अटक केली आहे, तर मुख्य आरोपी फरार आहे.

लॉकडाऊन असला तरी अनेक ठिकाणी चोरट्या मार्गाने दुकाने उघडून व्यवहार केले जात आहेत. त्याचाच गैरफायदा आरोपींनी उठवला. सोने खरेदीच्या बहाण्याने सराफाला सोने घेऊन बोलावून खून करण्यात आला. स्वस्तात सोने देण्याच्या बहाण्याने व्यावसायिकांना निर्जन ठिकाणी बोलावून मारहाण करून लुटमारीच्या घटना यापूर्वी नगर जिल्ह्यात घडल्या आहेत. मात्र, सोने खरेदीच्या बहाण्याने सराफाला बंद दुकानात बोलावून घेऊन लुटण्याची ही वेगळीच घटना नगर व बीड जिल्ह्याच्या सीमेवर घडली आहे.

शिरुर कासार येथील सराफी व्यावसायिक विशाल सुभाष कुलथे (वय २५) यांचा मृतदेह शेवगाव तालुक्यात आढळून आला होता. अधिक चौकशी केल्यानंतर या खून प्रकरणाला वाचा फुटली. शेवगाव तालुक्यातील भातकुडगांव येथील ज्ञानेश्वर गायकवाड यांचे शिरुर कासार येथे सलूनचे दुकान आहे. त्याच दुकानात सोनराचा खून करण्यात आला.



भातकुडगांव येथील गट शेतकरी दत्तात्रय हरिभाऊ गायकवाड यांच्या शेतात मृतदेह पुरुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न आरोपींनी केला होता. ज्ञानेश्वर शिवाजी गायकवाड याचे शिरुर कासार येथे सलूनचे दुकान आहे. त्याने सोने खरेदीचा बहाणा करून विशाल सुभाष कुलथे यांना आपल्या दुकानात बोलावलं. लॉकडाऊनमध्ये आपले लग्न झाले असून जास्त सोने करायचे आहे, असे सांगून ऑर्डर देण्यात आली. दुकानातील तयार असलेले सोन्याचे दागिने घेऊन माझ्या दुकानात या, असे गायकवाड म्हणाला.

कुलथे यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून सलून दुकानात सोने घेऊन गेले. तेथे गायकवाड याने साथीदारांच्या मदतीने त्यांचा खून केला आणि सोने घेऊन पोबारा केला. पोलिसांनी केतन लोमटे, शिवाजी गायकवाड यांना अटक केली आहे. मुख्य आरोपी ज्ञानेश्वर गायकवाड हा फरार आहे.

शिरुर कासारचे पोलिस निरीक्षक सिद्धार्थ माने यांनी या घटनेबाबत माहिती दिली आहे.

## पृष्ठ १ वरुन

### मुंबईत आमदाराच्या

दुचाकी चालकाने महिला ब्रीजवर चढली असून रडत असल्याची माहिती दिली. यानंतर कॉन्स्टेबल ढगे यांना तात्काळ घटनास्थळी पाठवण्यात आलं. दरम्यान यावेळी त्यांच्या सहकाऱ्यांनी कंट्रोल रुम, मानखुर्द पोलीस स्टेशन आणि नवी मुंबई पोलिसांना घटनेची माहिती दिली. कॉन्स्टेबल ढगे यांनी घटनेची संवेदनशीलता लक्षात घेता महिलेसोबत चर्चा करुन त्यांना खाली उतरवत आत्महत्येपासून परावृत्त केलं. यानंतर महिलेला मानखुर्द पोलीस ठाण्यात आणण्यात आलं. तिथे महिलेने आपण आमदाराची पत्नी असल्याची माहिती दिली. कौटुंबिक वादामुळे आपण तणावात होतो असंही यावेळी त्यांनी सांगितलं. महिलेला नंतर नवी मुंबई पोलिसांकडे सोपण्यात आलं, ज्यांनी कुटुंबाशी संपर्क साधत सर्व घटनाक्रम सांगितला.

### मुंबई, ठाण्यात लक्षणीय रुग्णघट

मराठवाड्यातील ग्रामीण भागांत मात्र या विषाणूचा विळखा वाढत आहे. या भागांत बाधितांचे प्रमाणही सुमारे २० ते ३० टक्के आहे. मुंबईत रविवारी करोनाचे १,४३१ रुग्ण आढळले, तर ४९ रुग्णांचा मृत्यू झाला. दिवसभरात नव्या रुग्णांपेक्षा अधिक म्हणजे १,४७० रुग्ण करोनामुक्त होऊन घरी परतले. ठाणे जिल्ह्यातही नव्या रुग्णांमध्ये घट होत असून, रविवारी ९०७ रुग्ण आढळले. दिवसभरात ५१ रुग्णांचा मृत्यू झाला. १६ ते २२ मेदरम्यान मुंबई, ठाण्यात आधीच्या आठवडय़ाच्या तुलनेत किंचित (अनुक्रमे १.३३ टक्के आणि २.१२ टक्के) रुग्णसंख्या वाढली आहे. मात्र, रुग्णसंख्येतील हा चढ-उतार अत्यल्प आहे. पुणे महानगरपालिका क्षेत्रात संसर्ग कमी झाला असला तरी पुणे ग्रामीणमध्ये मात्र रुग्णसंख्या ५ टक्क्यांनी वाढली आहे. मृतांची संख्याही या भागात १५ टक्क्यांनी वाढली आहे. सरलेल्या आठवडय़ाच्या आकडेवारीनुसार पश्चिम महाराष्ट्रात गेल्या आठवडय़ाच्या तुलनेत सोलापूर आणि सांगली जिल्ह्य़ातील ग्रामीण भागांत सर्वाधिक म्हणजे १३ टक्के रुग्णवाढ झाली आहे. त्याखालोखाल सातारा (८ टक्के), कोल्हापूर (१० टक्के) रुग्णसंख्या वाढली आहे. कोकणातही करोनाचा फैलाव वाढला असून, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीमध्ये गेल्या आठवडय़ाच्या तुलनेत १० टक्क्यांनी रुग्णसंख्या वाढली आहे. मराठवाडय़ात सर्वाधिक म्हणजे ११ टक्के रुग्णवाढ उस्मानाबादमध्ये नोंदवली गेली. त्याखालोखाल बीडमध्ये ९ टक्के तर औरंगाबाद, परभणीमध्ये ६ टक्क्यांनी रुग्णवाढ झाली आहे.

झपाटय़ाने झालेली रुग्णवाढ, मर्यादित सार्वजनिक आरोग्य व्यवस्था यांमुळे या विभागांमध्ये खाटा मिळविण्यासाठी रुग्णांना पायपीट करावी लागत असून, अनेक रुग्ण मुंबईकडे धाव घेत आहेत. अमरावतीतील करोना संसर्गाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढला आहे. आठवडाभरात रुग्णसंख्येत १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मृतांची संख्याही १३ टक्क्यांनी वाढली आहे.

पहिल्या लाटेच्या तुलनेत अधिक प्रसार पहिल्या लाटेच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाडय़ात दुसऱ्या लाटेत अधिक करोनाप्रसार होत असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. पहिल्या लाटेत सातारा, सांगली, कोल्हापूर येथे सुमारे दहा हजार रुग्ण बाधित झाले होते. दुसऱ्या लाटेत हे प्रमाण अनुक्रमे १०९ टक्के, ४८ आणि ५८ टक्क्यांनी वाढले. सोलापूरमध्ये पहिल्या लाटेत सुमारे साडेसात हजार रुग्णांना बाधा झाली होती, तर दुसऱ्या लाटेत ही संख्या १५७ टक्क्यांनी वाढली. कोकणात रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये अनुक्रमे तीन हजार आणि १३०० रुग्ण आढळले होते. दुसऱ्या लाटेत मोठय़ा प्रमाणात संसर्ग प्रसार झाला असून हे प्रमाण सुमारे २५० टक्क्यांनी वाढले आहे. मराठवाडय़ात पहिल्या लाटेच्या तुलनेत सर्वाधिक २६४ टक्क्यांनी रुग्णवाढ बीडमध्ये झाली आहे. याखालोखाल जालना, परभणी, हिंगोली या जिल्ह्य़ांचा समावेश आहे.

### 14 जण अद्याप बेपत्ता

माहिती पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी दिली. अन्य काही कुटुंबीयांचे नमुनेही घेण्यात येणार आहेत. अजूनही २३ मृतदेहांची ओळख पटलेली नाही, असे पोलिसांनी सांगितले. दरम्यान रायगड किनाऱ्यावर आढळून आलेले आठ मृतदेह रायगड पोलिसांनी मुंबई पोलिसांच्या ताब्यात दिले असून ते मुंबईत आणण्यात आले आहेत.

नौदलाकडून आयएनएस मकर या युद्धनौकेसह साइड स्कॅन सोनार या यंत्रणेच्या मदतीने बुडालेल्या नौकांचा शोध घेण्यात आला. नौदलाने 'पी ३०५' तराफा बुडालेल्या ठिकाणी रविवारी शोध घेतला. नौदलाच्या जवानांनी तराफा बुडालेल्या ठिकाणी समुद्राच्या तळाशी मृतदेह आहेत का याची पाहणी केली. यामध्ये कोणाचाही मृतदेह आढळून आला नाही, असे नौदलाकडून सांगण्यात आले आहे, तर आयएनएस मकरकडून वरप्रदा नौकेचा शोध सुरू आहे.

### नवघर पोलीसांनी लावला मोटार

गुन्ढे प्रकटाकरन पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास व ब्यातमीदारामार्फत गुन्हा करणा या आगोपीस अल्क करुन फिर्यादी यांची अपहार केलेली मोटार सायकल क्र. एमएच ४७ एफ २६४१ हस्तगत केलली आह. सदरची कामगिरी श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, डॉ.शशीकांत भोसल, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, यांच मार्गदर्शनाखाली मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निराक्षक, नवघर पोलीस ठाण सपोनि/भास्कर पुल्ली, सपोनि/यागंश काळे, पोउनि/संदिप ओहाळ, पोना/१४१८ रविद्र भालेराव, पाशि/२८३८ युनुस गिरगांवकर, पाशि/३४५८ सोदेप जाधव यांनी केला आहे.

### रात्रीच्या वेळी पादचारी इसमास

पडताळणी सदर गुन्हा उघरकीस आणलेला आहे. सदरची कार्मागरी श्री अमित काळे, पोलीस उप आयकत, परीरमंरळ ०१, डॉ.शशीकांत भासले, सहा.पा. आयुक्त, नवघर विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली मिलिद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस राण ,सर्पानि/योगेश काळे, पोर्डन/सोदप ओहोळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोशि/२/३८ युनुस गिरगावकर, पार्शि/३४८ सदिप जाधव यांना केली आहे.

### मुंबईतील 'या' पोलिस

लाचखोर अधिकाऱ्यांची नावे असून, जोशी यांना लाच घेताना पकडण्यात आले. सरकारी कामामध्ये अडथळा तसेच अन्य काही कलमांतर्गत एका बांधकाम व्यवसायिकावर धारावी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या कारवाई दरम्यान त्यांच्या अंगझडतीमध्ये पोलिसांना ४० हजार रोख, मोबाइल आणि इतर काही वस्तू सापडल्या. या वस्तू त्यांना परत करण्यासाठी उपनिरीक्षक अमोल गाडे यांनी त्यांच्याकडे १५ हजार रुपये मागितले. बांधकाम व्यावसायिकाची तयारी नसताना गाडे यांनी ४० हजारऐवजी ३० हजार रु. मिळाल्याचे दाखवत त्यातील पैसे काढून घेतले. पुढील कारवाईसाठी बांधकाम व्यावसायिकाला सहायक निरीक्षक प्रभाकर जोशी यांच्याकडे पाठविण्यात आले. पुढील कारवाई आणि तडीपारी थांबवायची असेल तर १२ हजार रुपये द्यावे लागतील, असे जोशी यांनी सांगितले. एसीबीकडे तक्रार केल्यानंतर १० हजार रु.ची लाच घेताना जोशी यांना अटक करण्यात आली.

### नवघर पोलीसांनी खोटे नाव सांगून

पाहिजे आरोपी नाम दिनश बी. शहा ऊर्फ तुषार बाबुभाई लुहार, रा. मिरारोड पुर्व यास गुन्हयाचा पुढील तपास करुन अटक करण्याची तजबीज ठवण्यात आलेलो आहे. नमुद गुन्हा दाखल हाताच गुन्हयाचा तत्काळ तांत्रिक तपास करुन तात्काळ नमुद गुन्हा उघडकांस आणुन गुन्हयातील फसवणुक ब अपहार झालला संपुर्ण माल हस्तगत करण्यात आलला आहे. सदरची कारमगरी श्री अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१ डा.शशीकांत भोसल, सहा पो. आयुक्त, नबघर विभाग,यांच मार्गदशंनाखाली मिलिद दसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नबघर पोलीस ठाणे सर्पान योगेश काळे, पार्डान/सादप ओहाळ, पोना/१४१८ रबिंद्र भालराब, पोशि/२८३८ युनुस गिरगाबकर, पॉशि ३४५८ सोदप जाधव यांनी केला आहे.

### गुजरातला जाणाऱ्या कारमध्ये

या क्रमांकाच्या गाडीत या नोटा सापडल्या. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे. बिछीवाडा पोलीस ठाणे हे गुजरातच्या हिम्मत नगर बॉर्डरवर आहे. येथून नॅशन हायवे जातो. या ठिकाणी नेहमीच तस्करी केली जाते. त्याचा पोलिसांकडून वेळोवेळी पर्दाफाशही केला जातो. मात्र, बिछीवाडा पोलिसांनी पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर रक्कम जप्त केली आहे.

### महाराष्ट्र चार टप्प्यात

आहे. मुंबईसह एमएमआर रिजनमधील स्थिती नियंत्रणात आहे. नाशिक, नागपूरमधील परिस्थितीदेखील चिंताजनक नाही. त्यामुळे या भागातील निर्बंध १ जूनपासून हळूहळू शिथिल केले जातील. निर्बंध एकदम मागे घेण्याऐवजी टप्प्याटप्प्यानं मागे घेतले जातील. कोरोना रुग्णसंख्या कमी झालेल्या जिल्ह्यांसाठी या प्रकारचे निर्णय घेतले जातील, असं राजेश टोपे यांनी सांगितलं.एका मराठी वृत्तवाहिनीच्या वृत्तानूसार, राज्य सरकार ४ टप्प्यात अनलॉकच्या प्रक्रियेला सुरुवात करणार असल्याची माहिती समोर आली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात दुकाने उघडली जातील.



संपादकीय...

## पेरिले ते उगवते

सरसंघचालक मोहनराव भागवत जे म्हणाले ते निश्चित विचार करण्यासारखे आहे आणि ते जे म्हणाले नाहीत ते विचार करण्यास उद्युक्त करणारे आहे. संघातर्फे आयोजित व्याख्यानमालेत भाषण करताना सरसंघचालकांनी सरकार, प्रशासन आणि नागरिक अशा सर्वाच्याच दुर्लक्षामुळे करोना सोकावला असे मत मांडले. ते खरेच आहे. अशा परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी विज्ञानाची कास धरणे हाच योग्य मार्ग असू शकतो, हे त्यांचे म्हणणेही तितकेच खरे. त्यांचे तिसरे सत्यकथन आहे ते आयुर्वेदाविषयी. प्राचीन भारताच्या निरामय जीवनशैलीच्या मुळाशी आयुर्वेद हे शास्त्र होते. तथापि सध्याच्या विषाणुकाळात आयुर्वेदाच्या नावे जे काही सुरू आहे त्याने उलट आयुर्वेदाची बदनामी होते. ‘‘कोणाला तरी कशाने तरी गुण येतो म्हणून त्याचा उपयोग सर्वानी करणे अयोग्य’’, हा सरसंघचालकांचा सल्ला गल्लोगल्ली उगवलेल्या आयुर्वेदाचार्यासाठी निश्चितच नाही. तो आयुर्वेदाच्या नावे काहीही सेवन/लेपन करणाऱ्या मूढजनांसाठी आहे. औषध हे ‘सातत्यपूर्ण प्रयोग आणि वैज्ञानिक निकष’ यावर तपासले जाणे आवश्यक आहे, हे सरसंघचालकांचे



प्रतिपादन तर विज्ञानाधिष्ठित वैद्यकाचा गाभा. आयुर्वेदिक म्हणवली जाणारी औषधे या दोन निकषांवर सिद्ध व्हायला हवीत या त्यांच्या म्हणण्याशी कोणाचेच दुमत असणार नाही. ही आयुर्वेदाची मात्रा सरसंघचालकांनीच चाटवली हे उत्तम. ‘एमबीबीएस’च्या प्रवेशास आवश्यक गुण न मिळाल्याने वैद्यकी करणाऱ्यांच्या आयुर्वेदाभिमानाविषयी प्रश्न निर्माण करणारे अलीकडे थेट राष्ट्रद्रोही ठरवले जातात. ही प्रथा सरसंघचालकांमुळे कायमची नष्ट होईल आणि त्यामुळे समस्त विज्ञानप्रेमी त्यांचे ऋणी राहतील.

सरकार, प्रशासन आणि नागरिक या तीनही घटकांनी करोनाच्या पहिल्या लाटेनंतर बेफिकिरी दाखवली हे सरसंघचालकांनी केलेले प्रतिपादन सर्वमान्य. त्याचे विश्लेषण करू गेल्यास दिसेल की यातील सरकार आणि प्रशासन या एकाच नाण्याच्या दोन बाजू. सरकारच्या हाती प्रशासनाचे सुकाणू असते. सरकारने सांगितले एक आणि प्रशासनाने केले दुसरेच, असे झाल्यास अराजक माजेल. म्हणजे प्रशासन बेजबाबदारीने वागले असेल तर त्यासाठी प्रशासनाचे नियंत्रण करणाऱ्या सरकारला जबाबदार धरण्याखेरीज पर्याय नाही. सरकार जर म्हणाले असते पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका लांबवा, किंवा घेतल्या जाणारच असतील तर मैदानी प्रचार होणार नाही याची काळजी घ्या, सरकार जर म्हणाले असते कुंभमेळा अजिबात आयोजित करू नका, तो भरला नाही म्हणून आकाश कोसळणार असल्यास सर्व प्रमुख आखाडय़ांच्या प्रमुखांस टप्प्याटप्प्याने गंगास्नान करवून तो प्रतीकात्मकरीत्या होऊ द्या, सरकार जर म्हणाले असते प्रचंड प्रमाणावर प्रचंड गतीने लसीकरण हाती घ्या, सरकारने आदेश दिला असता तर पहिल्या लाटेनंतर जनुकीय क्रमनिर्धारणास गती द्या.. तर यातील काहीही प्रशासनाने ऐकले नसते असे अजिबातच नाही. सरकार आदेश देईल त्याची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम. म्हणून सरसंघचालकांना अभिप्रेत असे प्रशासनाचे वर्तन झाले नसेल तर त्याचा दोष सरकारकडे जातो. सरकार हे चालक आणि प्रशासन हे वाहन हे सत्य लक्षात घेतल्यास अपघाताचे पाप मोटारीच्या माथी लागत नाही. ते चालकाच्या खात्यात जमा होते. तेव्हा करोना हाताळणीबाबत अधिक दोष सरकारचा.

राहता राहिला मुद्दा नागरिकांचा. आपल्याकडे जनसामान्य आपल्या नेत्याचे अनुकरण करतात. सर्वात लोकप्रिय नेत्याचे अनुकरण करणारे जनसामान्य संख्येने सर्वाधिक. किंबहुना ज्याचे अनुयायी सर्वाधिक तो सर्वात लोकप्रिय. असे असताना सर्वात लोकप्रिय नेता जर करोनाकाळात ‘‘पाहा, माझ्या सभेस किती गर्दी जमली’’ असा अवैज्ञानिक आनंद अभिमानाने मिरवत असेल तर या नेत्याचे पाठीराखे त्याचेच अनुकरण करणार, यात नवल ते काय! हा नेता जर जगातील सर्वात मोठय़ा राजकीय पक्षाचा दिशादर्शी असेल तर त्या पक्षाचे कोटय़वधी नोंदणीकृत सदस्य त्याने दाखवलेल्या दिशेनेच मार्गक्रमण करणार! भले तो मार्ग अशास्त्रीय आणि करोना विषाणूंनी भरलेला का असेना!! अशा तऱ्हेने करोनाच्या तिसऱ्या लाटेस तीन घटक जबाबदार आहेत असे दिसत असले तरी वस्तुत: त्या तिन्हींच्या शिरावरील जबाबदारीचा मोठा वाटा एकाच घटकाच्या खांद्यावर आहे. ते म्हणजे सरकार. हे सत्य जसे केंद्रास लागू पडते तसेच राज्याराज्यांसही तितकेच लागू पडते. म्हणून करोना हा प्राणी आहे, करोनाची तमा बाळगायचे कारण नाही, गंगामैयाच्या पवित्र स्पर्शाने तो धुतला जाईल, गोमय प्राशन वा लेपनाने त्याचे समूळ उच्चाटन होईल अशी वक्तव्ये राज्यस्तरावरील धुरीणांनी केली असल्यास आणि ते धुरीण सरकारशी संबंधित असल्यास त्या प्रांतातील करोना-प्रसाराची जबाबदारी त्या त्या सरकारांस घ्यावी लागणार.

# भूप्रयोगाचा भावयात्री




झाडाला मिठी मारणे. ही साधी क्रिया चळवळीचे हत्यार म्हणून पहिल्यांदा केली ती उत्तराखंडच्या गोपेश्वर भागातील गौरादेवी या महिलेने. गौरादेवीसारख्या असंख्य महिला ज्या ‘चिपको चळवळी’त उतरल्या त्यांना संघटनात्मक पाठिंबा दिला तो चंडीप्रसाद भट यांनी स्थापलेल्या ‘दशोली ग्राम स्वराज्य संघ’ या संस्थेने. तरीही या चिपको चळवळीचे जनक म्हणून सुंदरलाल बहुगुणा यांचे नाव घेतले जाते ते का, याचे कारण या चळवळीच्या घटनाक्रमात जरी मिळाले नाही तरी पुढल्या सुमारे पन्नास वर्षांमध्ये नक्कीच मिळालेले आहे. ते असे की, बहुगुणा हे केवळ ज्येष्ठ कार्यकर्ते किंवा चळवळीचे अग्रणी नव्हते, तर ते पर्यावरणाचे तत्त्वचिंतकही होते. चिपको या कृतीमधली वैश्विकता त्यांनी ओळखली होती आणि पुढे त्यांच्या अनेक व्याख्यानांमधून आणि त्याहूनही अधिक चळवळींना त्यांनी दिलेल्या पाठिंब्यातून बहुगुणांचे हे वैश्विक भान सातत्याने दिसत राहिले. त्या अर्थाने, ‘दास डोंगरी राहतो, चिंता विश्वाची वाहतो’ हे वर्णन त्यांना लागू पडते. त्यांच्या जाण्याचा शोक व्यक्त करताना विश्वाची ही चिंता कशी होती, या चिंतेशी केवळ पर्यावरणवादी म्हणवणाऱ्यांनीच नाते का जोडले आणि बाकीचे सगळे कोरडेच कसे काय राहिले, याचीही चर्चा होणे रास्त.

पर्यावरणवादाचा भारतीय आत्मा स्वातंत्र्योत्तर काळात बहुगुणा यांनीच दाखवून दिला, हे निर्विवाद. राखीव वनांची किंवा अभयारण्यांची कल्पना आपल्याकडे सम्राट अशोकाच्या काळापर्यंत मागे जाते आणि वेद जरी निसर्गाचे दैवीपण ओळखणारे असले तरी वृक्षवल्लींना सोयरे मानणाऱ्या आणि क्षुद्र कारणांसाठी स्वाहाकार नाकारणाऱ्या मध्ययुगीन संतांचे काम हे पर्यावरणीय जाणिवेला आध्यात्मिक बैठक देणारे ठरले. बहुगुणा वारसा सांगत तो या संतांचा. विशेषत: वृक्षरक्षक बिष्णोई पंथाचा आणि कबीराचा. गांधीवाद आणि आजचा पर्यावरणवाद यांमध्ये मूलत: फरक नाही, १९०९ साली गांधीजींनी लिहिलेले ‘हिंद स्वराज’ हे पुस्तक ही पर्यावरणवादाची गाथाच होय, असे आग्रही प्रतिपादन बहुगुणा अनेकदा करीत. त्यांची व्याख्याने ऐकणे हा एक प्रसन्न अनुभव असे. काहीशा पहाडी लकबीने, श आणि स या अक्षरांचा थारेपालट करणाऱ्या बोलीत, वाढत्या वयानुसार घ्यावे लागतील तेवढेच विराम घेत त्यांचा ओघ सुरू राही. त्यात टागोरांचे उदाहरण आले की हमखास जगदीशचंद्र बोस यांचेही नाव येई आणि या भारतीय शास्त्रज्ञाने झाडांना जीव असतो हे सिद्धच केलेले आहे, ती कविकल्पना नाही, यावर बहुगुणा भर देत. पण त्यांचा रोख असे तो भोगवादी जीवनशैलीवर. हे सारे अवडंबर नाकारूनही सुखसमाधान मिळवता येतेच, असे त्यांचे म्हणणे. गांधीजींची साधी राहणी स्वत: अंगीकारलेले बहुगुणा जे बोलताहेत त्यात एक सच्चेपणा आहे, अशी श्रोत्यांची भावना अगदी शहरांमधल्या, मध्यवर्ती वातानुकूलन यंत्रणेने युक्त अशा सभागृहात बहुगुणांचे भाषण ऐकतानाही होई. अशा अनुभवामुळे, चिपको चळवळीच्या यशानंतर चाळिशीतल्या बहुगुणांनी ४,७००हून अधिक किलोमीटर पायी फिरून, उत्तराखंडच्या गावोगावी जाऊन केलेली जागृती ग्रामीण, जानपद रहिवाशांना कशी भिडली असेल, हे नेमके समजून घेता येई. प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे काय, याचे बहुगुणा हे साक्षात उदाहरण होते. नर्मदा बचाओ आंदोलनाला त्यांचा आधार होताच, पण अन्य अनेक पर्यावरणवादी चळवळींना बहुगुणांमुळे माहीत झालेल्या चिपकोचा आदर्श बळ देई. हा धागा अगदी हल्ली मुंबईत झालेल्या आरे आंदोलनापर्यंत जोडता येतो. या मुंबईकर तरुणांना ‘हिंद स्वराज’मध्ये अपेक्षित असलेली जीवनशैली किंवा बहुगुणांची साधी राहणी आचरणात आणता येणार नाही हे निश्चित. शहरीकरणाची सर्वच्या सर्व फळे खाऊ शकणाऱ्या पिढीतले, व्यक्तिकेंद्री वातावरणामुळेच बंडखोरीची सहजप्रेरणा निसर्गप्रेमाच्या मार्गास लावणारे हे तरुण. तरीदेखील, दूरच्या दिव्यासारखे बहुगुणांचे असणे त्यांच्यासाठी महत्त्वाचे. या दिव्याचा मिणमिणता प्रकाश, पर्यावरणवादी चळवळींना यश मिळवता येते, याची ग्वाही देणारा.

चिपको चळवळीला यश मिळाले, यामागे अनेक कारणे आहेत. तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावरही पर्यावरण रक्षणाचा संस्कार शांतिनिकेतनात आणि अन्यत्र कसा झाला होता, याविषयी काँग्रेसच्या जयराम रमेश यांनी वेगळे पुस्तकच अलीकडे लिहिले आहे. तेव्हा उत्तराखंडातील या चळवळीनंतर लगोलग हिमालयातील केवळ अमुक उंचीच्या भूभागातील झाडेच कापता येतील आणि त्यावरच्या भूभागातील झाडे संरक्षित राहतील, हा नियम झाला यात नवल नाही. पण याच इंदिरा गांधींनी बहुगुणा आदींच्या पुढल्या मागण्यांना दाद दिली नाही, कारण तशी ती देणे अशक्यच होते. मोठय़ा धरणाऐवजी लहान धरणे बांधा अशी मागणी नर्मदा बचाओ आंदोलनाची होती, पण प्रशासकीयदृष्टय़ा मोठय़ा धरणाची तयारी इतकी पुढे गेली असताना ही मागणी ऐकणे अशक्यच ठरणार होते. बहुगुणा ज्यास थेट विरोध करीत होते त्या टिहरी धरणाला तर असा काही पर्यायदेखील नव्हता. ते धरण झालेच. भूकंप होणारच होते, तेही झाले. धरण बांधले जात असताना १९९१ मध्ये झालेल्या भूकंपाएवढी हानी मात्र नंतरच्या कोणत्याही भूकंपाने झाली नाही, हे प्रशासनाचेही यश. गंगा व तिच्या उपनद्यांच्या आरोग्यासाठी बहुगुणांनी दोन मोठी उपोषणे केली. त्यांना पंतप्रधान पातळीवरून सकारात्मक प्रतिसाद वगैरे जरूर मिळाला, पण जमिनीवरील परिस्थिती काही बदलली नाही, म्हणजेच प्रशासनाने यश मिळू दिले नाही. थोडक्यात, टिहरीविरोधी चळवळ आणि त्यानंतर, बहुगुणा यांची एकही मागणी थेट यशस्वी झालेली दिसत नाही. मुळात यश मिळवणे, जिंकणे ही स्पर्धात्मक प्रेरणा आदिम असली तरी भांडवलवादाने, औद्योगिकीकरण वा त्यानंतरच्या जीवनगतीने ती इतकी चोखपणे आत्मसात केली, की तिचा तात्त्विक प्रतिवाद करणाऱ्यांची पंचाईतच व्हावी. या आदिम प्रेरणेला पाशवी ठरवले तर मग आपण मांडलेल्या संकल्पनांसाठी झगडायचे किती, यावर मर्यादा येतात. मग पर्यावरणवादी चळवळींना या मर्यादा मान्य कराव्या लागतात आणि नव्या परिस्थितीत काय करायचे याचे भान असावे लागते. म्हणजे असे की, कोणीही हटणार नाही आणि धरण होऊच नये, असे निर्धाराने म्हणणाऱ्यांना जीवनशाळा चालवाव्या लागतात. त्याहीपुढे मग, शिक्षणातून येणाऱ्या नवजाणिवा आणि आदिवासी जीवननिष्ठा यांच्या झगडय़ाचे काय करायचे याचा प्रश्न व्यापक होणार असतो. हे असे आतून, आपल्याशीच लढणेदेखील प्रत्येक पर्यावरणनिष्ठाला करावेच लागते. समतोल साधावाच लागतो. तो समतोल न साधणे ही वैचारिक चैनच ठरू शकते. हा वैचारिक चैनीचा उंबरा खरोखरच ओलांडणारे फार थोडे. बहुगुणा किंवा मेधा पाटकर यांच्यावर अशा वैचारिक चैनीपणाचा आरोप कुणीही करू शकणार नाही आणि करूही नये, कारण पर्यावरणवादी चळवळीच्या या नेत्यांनी हेकटपणा एका मर्यादेपर्यंतच केला आणि समतोल साधून लोककेंद्री काम करण्यासही प्राधान्य दिले.

फुटबॉल किंवा हॉकीसारख्या खेळांमध्ये काहीसा कमकुवत असूनही तुल्यबळ ठरणारी लढत देणाऱ्या संघाचे जे दिलखुलास कौतुक आपण तो संघ हरल्यावरही करतो, तशी आत्मीय जाणीव पर्यावरणनिष्ठ चळवळींविषयी नेहमीच असायला हवी- विशेषत: त्या लढय़ाच्या प्रेरणा कोत्या नाहीत, स्वार्थी नाहीत, याची खातरजमा झाल्यावर तर अशा चळवळींविषयी आदरच असायला हवा. तसा आदर बहुगुणा यांच्या वाटय़ाला नेहमीच आला. त्यांचे आवाहन व्यवहारात यशस्वी झाले नाही, कारण ते भावनिक होते. पण आजकालची ग्रेटा थनबर्गसुद्धा भावनिक आवाहनामुळेच भिडत नाही काय? अशा भावनिक आवाहनास आपापली यशापयशे असणारच.

## तौक्ते वादळामध्ये होर्डिंग कोसळून दुर्घटना; कंपनी मालकावर गुन्हा



पनवेलमधील इंदिरा नगर येथे उड्डाणपुलालगत असलेल्या २० फुटी लोखंडी होर्डिंगची संबधित जाहिरात कंपनीने देखभाल-दुरुस्ती न केल्याने हे होर्डिंग सोमवारी आलेल्या तौक्ते वादळामध्ये कोसळून दुर्घटना झाल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यामुळे पनवेल महापालिकेच्या परवाना विभागाने या दुर्घटनेला मे. अलवेज ॲडव्हरटाईझिंग कंपनीला जबाबदार धरून कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल केला आहे. सोमवारी आलेल्या तौक्ते वादळामध्ये पनवेलच्या इंदिरा नगर येथील उड्डाणपुलालगत उभे असलेले २० फुटी लोखंडी होर्डिंग कोसळले होते. हे होर्डिंग मोटारसायकल, रिक्षा व अन्य वाहने व चार झोपड्यांवर कोसळून त्यांचे नुकसान झाले. तेथील झोपड्यांमध्ये कुणीही नव्हते, त्यामुळे या दुर्घटनेत जीवितहानी झाली नाही. या दुर्घटनेनंतर पनवेल महापालिकेच्या परवाना विभागाने माहिती काढली असता, हे होर्डिंग वाशीतील मे. अलवेज ॲडव्हरटायझिंग कंपनीने उभारल्याचे आणि त्याला पनवेल महापालिकेने २०१४ पासून ते फेब्रुवारी २०२० पर्यंत सहा वर्षांच्या कालावधीसाठी परवानगी दिल्याचे आढळले. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये या जाहिरात कंपनीसोबतचा करारनामा संपुष्टात आला असतानाही संबंधित कंपनीने करारनामा न वाढविता, या होर्डिंगच्या 'स्ट्रक्चर'ची देखभाल-दुरुस्ती न करता मागील वर्षभरापासून या होर्डिंगवर जाहिराती करणे सुरूच ठेवल्याचे आढळून आले. त्यामुळेच वादळामध्ये हे होर्डिंग कोसळून वाहने व झोपड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे पनवेल महापालिकेच्या परवाना विभागाने केलेल्या तपासणीत आढळून आले. त्यामुळे परवाना विभागाने या घटनेला जाहिरात कंपनीला जबाबदार धरून त्याच्या मालकाविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या जाहिरात कंपनीचा मालक परवेझ एन. खान याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीतदेखील संबंधित जाहिरात कंपनी व अन्य कंपन्यांकडून अशाच पद्धतीने ठिकठिकाणी लोखंडी होर्डिंग उभारण्यात आले आहेत. या होर्डिंगचीही देखभाल-दुरुस्ती संबंधित कंपनीकडून होत नसल्याने हे होर्डिंगदेखील कोसळण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे नवी मुंबईत उभारण्यात आलेल्या सर्व होर्डिंगची तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## ‘10 कोटी द्या अन्यथा शासकीय कार्यलयं बॉम्बने उडवून टाकू'

नांदेड : दहा कोटी रुपये द्या, नाहीतर नांदेडचे जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधिक्षक कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय व अन्य शासकिय कार्यालय बॉम्बने उडवून टाकू, अशा धमकीचा मेल पाठवणाऱ्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी (ता.23) अटक केली.

अधिक माहितीनुसार, आरोपी यामध्ये 10 कोटी रुपये द्या अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधिक्षक कार्यालय, इतर महत्वाची कार्यालये आणि संपुर्ण नांदेड शहर बॉम्बने उडवून टाकेन असा संदेश सदर ई-मेलमध्ये लिहिलेला होता. या प्रकरणी विविध आंतरराष्ट्रीय कंपनीसोबत संपर्क साधून या मेल पाठविणाऱ्याची माहिती मिळवली. आरोपी शेख अब्दुल रफिक अब्दुल रऊफ



विरोधात वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील 125 जागी हॉटस्पॉट फुटायला तयार आहेत, अशी धमकी होती.

सोबतच त्याने सर्व कार्यालयांची लिस्ट जोडली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ई-मेल आयडीवर 8 मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास एक मेल आला.

(35, व्यवसाय व्यापारी, रा.आगापुरा अर्धापूर, जि.नांदेड यास रविवारी अटक केली. पोलीस उपनिरिक्षक आशिष बोराटे यांच्या तक्रारीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात धमकीचा मेल पाठविणाऱ्या शेख अब्दुल रफिक अब्दुल रऊफ याच्याविरूद्ध सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला.

## अन् त्यांच्यामुळे नाशिकच्या सिव्हिल रुग्णालयातील 'ही' मोठी दुर्घटना टळली

नाशिक महापालिकेच्या झाकीर हुसैन रुग्णालयाच्या ऑक्सिजन गॅस गळतीची दुर्घटनेला महिना उलटत नाही तोच रविवारी रात्री सिव्हिल हॉस्पिटलमध्ये सक्शन कॉम्प्रेसरमधून स्फोटासारखा आवाज झाल्याने गोंधळ उडाला. मात्र, ही घटना थोडक्यात निभावल्याने मोठी दुर्घटना घडली. अग्निशमन विभागाने हा बिघाड दुरुस्त केल्यानंतर सर्वांनी नि:श्वास सोडला.सिव्हिल हॉस्पिटल राज्यातील सर्वांत मोठे जिल्हा शासकीय रुग्णालय आहे. या हॉस्पिटलमध्ये नवजात अर्भकांसह अनेक कोव्हिडबाधित व अन्य रुग्ण उपचार घेत आहेत. रविवारी रात्री नऊच्या सुमारास येथील सक्शन यंत्रणेजवळ मोठा आवाज झाला.



या आवाजामुळे सिव्हिल हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांमध्ये घबराट पसरली. हॉस्पिटलमधील ऑक्सिजन गॅसच्या लाइनला गळती लागल्याच्या चर्चेचे पेव फुटले. ही वार्ता काही वेळातच वाऱ्यासारखी पसरली. रुग्णांचे नातेवाईक, कर्मचारी अशा सर्वांनीच आवाजाच्या दिशेने धाव घेतली. महापालिकेच्या अग्निशमन विभागाला पाचारण करण्यात आले. पोलिसही घटनास्थळी पोहोचले. नवजात अर्भके किंवा इतर रुग्णांचा शरीरातील घाण ओढून काढण्याच्या उपचारात वापर करण्यात येणाऱ्या सक्शन यंत्रणेतील कॉम्प्रेसरमध्ये बिघाड झाल्याचे पाहणीत निष्पन्न झाले. त्यामुळे हा बिघाड दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले.

सक्शन कॉम्प्रेसरच्या कपलिंगमध्ये लिकेज झाल्याने हा तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निखिल सैंदाणे यांनी दिली. ऑक्सिजनची लाइन आणि ऑक्सिजनची टाकी पूर्णपणे वेगळी असल्याने या घटनेचा आणि ऑक्सिजन लिकचा काहीही संबंध नसल्याचे सिव्हिल प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्व रुग्ण सुरक्षित असल्याचेदेखील सांगण्यात आले आहे.

सक्शन यंत्रणेत बिघाड झाल्याने नवजात अर्भकांचा जीव धोक्यात असल्याचे वृत्त अलीकडेच 'मटा'ने उघडकीस आणले होते. अशा कुचकामी यंत्रणेमुळे भविष्यात भंडारा जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील दुर्घटनेसारखी घटना घडू शकते, याकडे लक्ष वेधण्यात आले होते. प्रशासन ठोस उपाययोजनेऐवजी वेळकाढूपणा व कामचलावू वृत्तीचे दर्शन घडवत असल्याचा प्रकारही या माध्यमातून चव्हाट्यावर आणण्यात आला होता. पाठोपाठ आता पुन्हा हा प्रकार घडला आहे.

# मा.स्व.बाळासाहेब ठाकरे कलादालन उभारण्याचा मार्ग मोकळा
## अतिक्रमण व सार्वजनिक बांधकाम विभागाची धडक कारवाई.





मिरा-भाईदर महानगरपातिका क्षेत्रात सन २०१७ सात्री मा. स्व.बाळासाहेब ठाकरे कलादालन उभारण्याबाबत मा.विशेष महासभा ठराव क्र.3१ दि.८/११/२०१७ रोजी पारित करण्यात आला होता. सदर ठरावानुसार महानगरपालिकेचे आरक्षण क्र.१२२ येथे मा.स्व.बाळासाहेब ठाकरे कलादालन उभारण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार नगररचना विभागाकडे नकाशा मंजुरीस्तत पाठविण्यात आला. त्यास नगररचना विभागाने दि.२४/९/२०१८ रोजी मंजुरी दिली. त्यानुसार सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. त्यास शासनाने दि.२१/९/२० रोजीच्या पत्रान्वये मंजुरी दिली. त्यानुसार आरक्षण क्र.१२२ येथे मा.स्व.बाळासाहेब ठाकरे कलादालन उभारण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने कामकाज सुरु केले. याकरीता शासनाकडून महानगरपालिकेस रु.3८ कोटी एवढा निधी मंजुर करण्यात आला आहे. मात्र तेथे असलेल्या अनाधिकृत झोपडीधारकाकडून अतिक्रमण काढण्यास विरोध करण्यात येत होता. महानगरपालिकेच्या नावे असलेल्या या आरक्षीत असलेल्या जागेत ४३ झोपडीधारकांनी आरक्षित जागेत अतिक्रमण केले होते. त्याबाबत त्यांनी मा.न्यायालयात हि दावा दाखल केला होता. मात्र न्यायालयाकडून त्यांना स्थगिती देण्यात आली नाही. याबाबत विधी विभागाच्या श्रीम.सई वडके यांनी न्यायालयात महानगरपालिकेची बाजु मांडण्याकरीता आवश्यक ती सर्व कागदपत्रे सार्दजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करुन महानगरपालिकेचे कौन्सीलर श्रीम.संगिता फड यांचेमार्फत महापालिकेची बाजू भक्कमपणे मांडली. या झोपडीधारकांची महानगरपालिकेमार्फत ही सुनावणी




घेण्यात आली होती. त्यातील पात्र झोपडीधारकांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून भाडे तत्वावरील घरे या योजनेतंर्गत प्राप्त झालेल्या घरापैकी ३३ पात्र झोपडीधारकांना एस.के.हाईटस पेणकरपाडा या इमारतीमधील सदनिका दि.२०/५/२१ रोजी हस्तांतरीत करण्यात आल्या. सदर आरक्षीत जागेवर अतिक्रमण केलेल्या झोपडीधारकांना सदनिका हस्तांतरीत केल्यामुळे तेथे असलेले अनाधिकृत बांधकाम काढण्याचे आदेश महानगरपालिकेचे आयुक्त मा.श्री.दिलीप ढोले यांनी उपायुक्त श्री.अजित मुठे यांना दिले. त्यानुसार उपायुक्त श्री.अजित मुठे यांच्या नेतृत्वाखाली दि.२२/५/२०२१रोजी प्रभाग अधिकारी श्रीम.कांचन गायकवाड, महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री.सुरेश वाकोडे, उप अभियंता श्री.नितीन मुकणे, अतिक्रमणचे विभाग प्रमुख श्री.नरेंद्र चव्हाण, प्रभाग अधिकारी श्री.स्वप्निल सावंत, कनिष्ठ अभियंता श्री.चेतन म्हात्रे त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे कनिष्ठ अभियंते श्री.सुदर्शन काळे, श्री.विकास शेळके, श्री.शुभम पाटील यांच्या उपस्थितीत तोडक कारवाई करण्यात आली. या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणुन पोलिस उपायुक्त श्री.अमित काळे, सहा.पोलिस आयुक्त श्री.शशिकांत भोसले, नवघर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक, श्री.मिलिंद देसाई, सहा. पोलिस निरिक्षक, श्री.मासाळ, श्री.गायकवाड त्याचप्रमाणे अतिक्रमण विभागाचे पोलिस कर्मचारी व नवघर पोलिस स्टेशनचे कर्मचारी यांनी उपस्थित राहून चोख बंदोबस्त ठेवला. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडून आला नाही. तसेच सुरक्षितता म्हणुन महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या दोन बसेस देण्यात आल्या. त्याचप्रमाणे अग्निशमन विभागाचे दोन बंब पुरविण्याचे आदेश उपायुक्त डॉ.संभाजी पानपट्टे यांनी अग्निशमन विभागाला दिले होते. त्यानुसार अग्निशमन विभागप्रमुख श्री.प्रकाश बोराडे, श्री.जॉन्सन ढोल्या व इतर कर्मचारी अग्निशमन पथकासह उपस्थित होते. वैद्यकिय विभागाचे उपायुक्त श्री.संभाजी वाघमारे यांनी तातडीची बाब म्हणुन वैद्यकिय विभागामार्फत रुग्णवाहणी घटनास्थळी तयार ठेवल्या होत्या.

## अनिल देशमुख, परमबीर सिंगांसह ५ जणांना आयोगाची नोटीस; ११ जूनपर्यंत कागदपत्रे सादर करा



राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी केलेल्या आरोपांची चौकशी करणाऱ्या न्या. कैलाश चांदीवाल आयोगाकडून नोटीस बजावण्यात आली आहे. यामध्ये अनिल देशमुख, परमबीर सिंग, सचिन वाझे यांच्यासह इतर ५ जणांना ११ जूनपर्यंत शपथपत्रे आणि कागदपत्रे सादर करण्यासंबंधी नोटीस बजावली आहे. बजावण्यात आलेल्या या नोटीसमध्ये एसीपी संजय पाटील आणि अनिल देशमुख यांचे स्वीय सचिव संजीव पलांडे यांचाही समावेश करण्यात आला आहे. या सगळयांच्या शपथपत्रांसह कागदपत्रांची तपासल्या केल्यानंतर या सर्वांना समितीसमोर बोलविण्यासंदर्भातील निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परमबीर सिंग यांनी २० मार्च रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून देशमुख यांच्यावर १०० कोटींच्या खंडणीसंदर्भात आरोप केले गेले होते. दरम्यान, त्याची चौकशी करण्यात यावी यासाठी राज्य शासनाकडून चांदीवाल आयोग स्थापन करण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे. सर्व निर्णय आयोगाकडून घेतले जाणार चांदीवाल आयोगातील चांदीवाल समितीने एक नियमावली तयार केली असून त्यानुसार, कागदपत्रे सादर करण्यास, साक्षीदार आणण्यास किंवा केसची तयारी करण्यासाठी मुदत दिली जाणार नाही. वकील गैरहजर आहेत, यासारख्या कारणांवरून देखील मुदतवाढ दिली जाणार नाही. चौकशी करण्याचे काम कागदपत्रे किंवा प्रतिज्ञापत्रांच्या आधारे करायचे की तोंडी पुरावे घ्यायचे, याबाबतचा सर्व निर्णय आयोगाकडून घेण्यात येणार आहे. मंत्रालयाजवळील जुने सचिवालय इमारतीत न्या. चांदीवाल आयोगाला कार्यालय देण्यात आले आहे. मात्र, शासनाकडून अद्याप सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. आयोगाने त्याबाबत सातत्याने पाठपुरावा केला असल्याचे देखील सांगितले जात आहे.

## मुंबईत दादर मार्केटजवळ प्रवाशानं टॅक्सी चालकाला पेव्हर ब्लॉकनं ठेचलं, जागीच मृत्यू!



रिक्षा किंवा टॅक्सी चालक भाडं नाकारल्यामुळे प्रवासांसोबत होणारे वाद आणि हाणामारीच्या घटना मुंबईकरांसाठी काही नवीन नाहीत. पण रविवारी पहाटे मुंबईत दादर मार्केट येथे धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. भाडं नाकारल्याच्या रागातून एका प्रवाशानं टॅक्सी चालकाची पेव्हर ब्लॉकनं ठेचून हत्या केल्याची भयंकर घटना समोर आली आहे. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या प्रवाशाचं टॅक्सी चालकानं भाडं नाकारलं म्हणून त्याच्याशी भांडण झालं. वाद इतका विकोपाला पोहोचला की प्रवाशानं सीमेंटच्या पेव्हर ब्लॉकनं टॅक्सी चालकाला ठेचलं. टॅक्सीचालकाचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी आरोपी प्रवाशाला अटक करण्यात आली आहे. ३० वर्षीय आरोपी बसवराज मेलिनमानी हा मूळ कर्नाटकातील विजयनगरचा रहिवासी आहे. सध्या तो दादरमधील सेनापती बापट मार्गावर आंबेडकर नगर भागात राहतो. दादर मार्केट परिसरातच त्याने मद्यपान केले. त्यानंतर संबंधित टॅक्सी चालकाला त्याने आपल्या घरी सोडण्यास सांगितलं. ५४ वर्षीय टॅक्सी चालक छबिराज जैस्वार यांनी भाडं नाकारलं. यावरुन दोघांमध्ये प्रचंड वाद झाला. दोघांमध्ये झालेल्या वादावादीत टॅक्सी चालक फूटपाथवर पडला. याचवेळी मद्यधुंद अवस्थेत असलेल्या बसवराजने जवळ पडलेले तीन पेव्हर ब्लॉक्स उचलले आणि जैस्वार यांच्या डोक्यावर आदळले.सकाळी साडेसहाच्या सुमारास स्थानिक रहिवाशांनी टॅक्सीचालकाला रस्त्याच्या कडेला रक्ताच्या थारोळ्यात पडलेलं पाहिलं. त्यांनी तातडीने पोलीस कंट्रोल रुमला याविषयी माहिती दिली. त्यानंतर दादर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

## पोलिसांवरील हल्लाप्रकरणी रालोद नेता अटकेत, निवडणूक काळात केली होती दगडफेक

मथुरा (उत्तरप्रदेश) : पंचायत निवडणुकीदरम्यान पोलिसांवर झालेल्या हल्लाप्रकरणी फरार असलेला रालोद नेता योगेश नौहवार याला त्याच्या घरातून गजाआड करण्यात आले. याच प्रकरणात त्याचा साथीदार अजय सिंह यालाही अटक करण्यात आली आहे.

नौहवारने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता; परंतु न्यायालयाने पोलिसांच्या आक्षेपानंतर तो फेटाळला होता. या संपूर्ण प्रकरणाबाबत माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, जिल्हा पंचायत सदस्यपदाचे उमेदवार व रालोद समर्थित उमेदवार सोनू चौधरी याने लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी २० एप्रिल रोजी पंचायत बोलावली होती. यावेळी मेजवानीचाही बेत होता; मात्र याला प्रशासनाकडून परवानगी घेण्यात आली नव्हती.या प्रकाराबाबत माहिती मिळताच



पोलीस मुडिलया गावात गेले. तेथे विनापरवानगी अनेक लोक जमलेले पाहिले. लोक कोरोना नियमांचेही पालन करीत नव्हते. निवडणूक अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय मेजवानी सुरू होती.

पोलिसांनी लोकांना तेथून जाण्यास सांगितले असता, दगडफेक करण्यात आली. यात पोलीस ठाणे प्रभारीसह चार पोलीस गंभीर जखमी झाले होते. पोलिसांच्या वाहनाची तोडफोडही करण्यात आली होती.या घटनेनंतर पोलिसांनी १२ पेक्षा अधिक आरोपींना अटक केली होती; परंतु मुख्य आरोपी नौहवार व उमेदवार सोनूसह अन्य आरोपी फरार झाले होते. नौहवारचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळल्यानंतर त्याला गजाआड करण्यात आले.

## कोठडीतील मृताची बत्तीस तासांनंतर उत्तरीय तपासणी



आमगाव (जि. गोंदिया) : चोरीच्या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केलेल्या राजकुमार धोती याचा पोलीस कोठडीत शनिवारी मृत्यू झाला. त्यानंतर तब्बल ३२ तासांनंतर धोती याच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी रविवारी दुपारी १ वाजता गोंदिया येथे केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात करण्यात आली.आमगाव येथील जिल्हा परिषद शाळेतून दोन वेळा संगणक संच व एलसीडीची चोरी करणाऱ्या चार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी अटक केली होती. पथकाने त्यांची चौकशी केल्यानंतर शुक्रवारी पहाटे १ वाजता मृत धोती, सुरेश राऊत व राजकुमार मरकाम या तिघांना आमगाव पोलिसांच्या स्वाधीन केले होते. या आरोपींना दुसऱ्या दिवशीही आमगाव पोलिसांकडे सोपविता येऊ शकत होते; परंतु गुन्हे शाखेने रात्रीच आरोपींना आमगाव पोलिसांच्या स्वाधीन का केले, गुन्हे शाखा पोलिसांनी अटक असलेल्यांना मारहाण केली का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.राजकुमार धोती याच्या मृतदेहावर आमगाव येथे उत्तरीय तपासणी होऊ शकली नाही. नागरिकांचा आक्रोश पाहता मृतदेह गोंदियाला पाठविण्यात आला.

## हत्या प्रकरणात सुशीलच्या अटकेनंतर संमिश्र प्रतिक्रिया, विश्व कुस्तीदिनीच झाली अटक

नवी दिल्ली : देशातील महान ऑलिम्पियनपैकी एक सुशील कुमारला हत्या प्रकरणात अटक झाल्यानंतर देशातील क्रीडा जगतात निराशेचे वातावरण आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर पदक पटकावीत देशाची मान उंचावणारा सुशील कुमार अनेक दिवस गायब राहिल्यानंतर ज्यावेळी पकडल्या गेला त्यावेळी रविवारी त्याने आपले तोंड टॉवेलाने झाकले होते आणि दिल्ली पोलीसच्या विशेष सेलच्या अधिकाऱ्यांनी त्याचे दोन्ही हात पकडले होते. दुर्दैवाने हे सर्वकाही विश्व कुस्ती दिनाच्या दिवशी घडले.भारतीय कुस्तीची नर्सरी मानल्या जाणाऱ्या छत्रसाल स्टेडियममध्ये मारहाणीदरम्यान २३ वर्षीय मल्ल सागर धनकडच्या मृत्यूमध्ये कथित रूपाने समावेश असल्याप्रकरणी सुशील



अजामीनपात्र वारंटपासून पळ काढत होता. ऑलिम्पिकमध्ये दोन वैयक्तिक पदके पटकाविणाऱ्या सुशीलने छत्रसाल स्टेडियमला फार लोकप्रिय केले. सागर दिल्ली पोलीसच्या कॉन्स्टेबलचा मुलगा होता आणि स्टेडियममध्ये सराव करीत होता. मारहाणीदरम्यान झालेल्या दुखापतीमुळे ५ मे रोजी त्याचा मृत्यू झाला.या घटनेमुळे भारतीय क्रीडा जगत स्तब्ध झाले आहे, पण सुशील कुमारच्या उपलब्धीचा आदर कायम आहे. सुशील कुस्तीमध्ये भारताचा एकमेव विश्व चॅम्पियन व राष्ट्रकुल स्पर्धेतील तीन वेळचा सुवर्णपदक विजेता आहे. चौथ्यांदा ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्याची तयारी करीत असलेला अचंता शरत कमल म्हणाला, या घटनेमुळे भारतीय खेळाच्या प्रतिमेला नुकसान होईल. जर खरेच असे घडले असेल तर ते दुर्दैवी आहे. केवळ कुस्ती नव्हे तर भारतीय खेळांवर याचा वाईट प्रभाव पडेल. सुशील आपल्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक आहे. लोक त्याच्यापासून प्रेरणा घेतात. त्यामुळे त्याने खरेच असे केले असेल तर केवळ मल्लांवरच नव्हे तर अन्य खेळांच्या खेळाडूंवरही त्याचा नकारात्मक प्रभाव पडेल.' एक माजी हॉकी कर्णधार म्हणाला, सुशीलसारख्या दर्जाच्या हिरोने असे कृत्य करणे खेळासाठी चांगले नाही. त्याच्यावरील आरोप सिद्ध झाले तर भारतीय खेळासाठी सर्वांत काळा अध्याय राहील. तो अनेक युवा खेळाडूंसाठी आदर्श होता.' एक प्रख्यात नेमबाज म्हणाला, 'ऑलिम्पियनबाबत चर्चा करताना त्यासोबत अशा बाबीची चर्चा कधी ऐकली नाही.

## रोजगार गेल्याने पोटच्या मुलाला विकण्याची वेळ; आई-वडिलांसह एजंट महिलेला कल्याणमध्ये अटक



कल्याण : कोरोनामुळे होणारे लॉकडाऊन व सततच्या कठोर निर्बंधांमुळे रोजगार नसल्याने उल्हासनगरच्या एका रिक्षाचालकाने परिस्थितीला कंटाळून चक्क पोटच्या गोळ्याला ९० हजार रुपयांना विकण्याचा प्रयत्न केला. पत्नी आणि सात मुलांचे पालनपोषण कसे करायचे, या विवंचनेत हा रिक्षाचालक होता. जिल्हा महिला बालसंरक्षण कक्षाने कल्याण गुन्हे शाखेच्या सहकार्याने कल्याण रेल्वेस्थानकावर सापळा रचून आई-वडिलांसह महिला एजंटला शनिवारी रात्री अटक केली. तिघांना कल्याणच्या महात्मा फुले चौक पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.साईनाथ भोईर हा मूळचा उल्हासनगरचा आहे. रिक्षा चालवून तो कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. पत्नी आणि सात मुले असे त्याचे कुटुंब आहे. मागच्या मार्च महिन्यापासून लॉकडाऊन सुरू झाले. लॉकडाऊन सुरू होण्याआधीच साईनाथवर कर्ज होते. त्यात पुन्हा निर्बंध लागू झाल्याने उत्पन्नाअभावी घरखर्च कसा भागवायचा, हे त्याच्यासमोर मोठे आव्हान होते. सततच्या निर्बंधांमुळे तो आर्थिक विवंचनेत होता. याच कालावधीत त्याच्या संपर्कात मानसी जाधव नामक महिला आली. मानसी ही पूर्वी एका सामाजिक संस्थेत कामाला होती. मानसीने साईनाथला त्याचा पाच महिन्यांचा मुलगा विकत मागितला. त्या बदल्यात साईनाथला ९० हजार रुपये देण्याचे कबूल केले. मानसीला दुसऱ्याकडून या मुलाच्या मोबदल्यात दोन लाख रुपये मिळणार होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898